मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

follow us : /rajdandlive



'सैनिकी पॅटर्न' निवासी शाळेतील ३५ विद्यार्थ्यांना जेवणातून विषबाधा वृत्त पान ५ वर...

RNI Regd. No. 72105/99 ⁘ वर्ष २५ ⁘ अंक २३३ ⁘ सातारा ⁘ बुधवार, दि. १ मे २०२४ ⁘ पाने ८ (सुप्रभात) ⁘ किंमत ५/– रूपये

# माझ्यावर बोलण्याची त्यांची लायकी नाही - शरद पवार

## कशाकशातून बाहेर काढलं, यादी दिली तर त्यांच फिरणं अवघड होईल! - पवारांचा धनंजय मुंडेंना इशारा

**मुंबई : अजित पवार यांनी बंड केल्यानंतर धनंजय मुंडे थेट अजित पवार गटात शिरले. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीत ते शरद पवारांवर जोरदार टीका देखील करू लागले आहेत. त्याच अनुषंगाने शरद पवार यांना एका वृत्तपत्राने घेतलेल्या मुलाखतीत प्रश्न विचारला असता त्यावर शरद पवार यांनी प्रत्युत्तर देत धनंजय मुंडे यांची माझ्यावर बोलण्याची लायकी नाही. त्यांना कशाकशातून बाहेर काढलं, याची यादी दिली तर त्यांचं फिरण मुश्किल होईल, असे म्हणत शरद पवार यांनी मुंडेंना इशाराच दिला.**

राष्ट्रवादीतील फुटीनंतर अजित पवारांसोबत अनेक आमदार गेले. विशेष म्हणजे अजित पवारांसोबत गेलेल्या ९ आमदारांनी मंत्रिपदाची शपथही घेतली. त्यामध्ये, धनंजय मुंडेंना कृषीमंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. या फुटीनंतर बीडमध्ये झालेल्या जाहीर सभेत धनंजय मुंडेंनी अजित पवार हेच माझं सर्वस्व असल्याचं म्हटलं. तर, शरद पवार यांचं नाव न घेता टीकाही केली.

आता, लोकसभा निवडणुकांच्या अनुषंगाने राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी असा सामना रंगला आहे. पवार विरुद्ध पवार असाही सामना पाहायला मिळत आहे. त्यात, अजित पवारांकडे असलेल्या धनंजय मुंडेंनी शरद पवारांनी केलेल्या विधानावरुन थेट हल्लाबोल केला होता. शरद पवार यांनी सुनेत्रा पवार यांच्याबद्दल केलेल्या विधानाचा संदर्भ देत धनंजय मुंडेंनी त्यांच्यावर बोचरी टीका केली. अर्थात, शरद पवारांना मुंडेंचे हे शब्द चांगलेच टोचले आहेत. त्यामुळेच, धनंजय मुंडेंच्या प्रश्नावर बोलताना शरद पवारांनी तीव्र शब्दात भावना व्यक्त केल्या आहेत. 'लोकमत' ने घेतलेल्या मुलाखतीत शरद पवारांना हा प्रश्न विचारण्यात आला.



त्यावर शरद पवार म्हणाले की, ज्यांचं नाव तुम्ही घेता, त्यांची लायकी नाही, त्यांना कशाकशातून बाहेर काढलं याची जर यादी दिली तर त्यांना फिरणं मुश्कील होईल, असे म्हणत शरद पवारांनी धनंजय मुंडेंचं नाव न घेता जोरदार टोला लगावला.

शरद पवार पुढे म्हणाले की, एकंदरीत त्यांनी केलेले उद्योग मी आता बोलू इच्छित नाही. त्यांना एक लहान कुटुंबातला, लहान समाजातला एक उदयोन्मुख तरुण दिसतो म्हणून त्यांना हाताला धरुन विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी दिली. लोकांची नाराजी होती, हे सगळं माहिती असतानासुद्धा ते आता माझ्यावर व्यक्तिगत हल्ले करायला लागले, कुटुंबावर हल्ले करायला लागले त्याच्यावर मी आता भाष्य करणार नाही. आज शेवटचा उल्लेख त्यांच्याबद्दलचा माझ्याकडून होईल, अशी संतापजनक मत त्यांनी व्यक्त करत धनंजय मुंडेंना सुनावलं.

धनंजय मुंडेंनी थेट शरद पवारांना टार्गेट करताना निगरगट्ट असा शब्दप्रयोग केला होता. दिलेला शब्द पूर्ण करणारा एकमेव नेता महाराष्ट्रात तो म्हणजे अजितदादा पवार आहे. महायुतीच्या नेत्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र, मराठवाडा पुढे येईल. सुनेला परकी म्हणता, तुमच्याही घरात देखील लेकी आहेत. एक निवडणूक जिंकायची म्हणून तुम्ही जर सुनेला परकी म्हणत असाल तर एवढी वेळ वाईट कोणावर येऊ नये. तुम्ही इतकं निगरघट्ट कसे झाला की सूनेला परके म्हणू लागलात'', अशा शब्दात मुंडेंनी शरद पवारांवर बोचरी टीका केली होती. सुनेत्रा पवार यांच्या प्रचारार्थ इंदापूर येथील सभेत धनंजय मुंडेंनी शरद पवारांवर शाब्दीक वार केला होता.

# विकासकामात टक्केवारी खाणाऱ्या गद्दार खासदारांना जेलची हवा खायला लावणार : आदित्य ठाकरे

■ युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांचा इशारा, पेठ वडगावात विजयी निर्धार सभेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**पेठ वडगाव :** दहा वर्षात दिलेले एकही वचन पूर्ण केले नाही आणि ७५ वर्षाचा हिशेब विचारतात हे देशाचे दुर्दैव मानावे लागेल. मतदारसंघात गद्दार खासदारांना म्हणेल तिथे निधी उपलब्ध करून दिला. मात्र हा निधी कोठे गेला याचा पत्ता नाही. विकासकामात टक्केवारी खाणाऱ्या गद्दार खासदारांना आमची सत्ता आल्यावर जेलची हवा खायला लावणार असा इशारा शिवसेना युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी जिल्ह्यातील दोन्ही खासदारांना दिला.

पेठ वडगाव (ता.हातकणंगले) येथील पालिका चौकात घेण्यात आलेल्या महाविकास आघाडीचे उमेदवार सत्यजीत पाटील यांच्या प्रचारार्थ विजयी निर्धार सभेत ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थित माजी सामाजिक न्यायमंत्री खासदार चंद्रकांत हांडोरे, माजी राज्यमंत्री सतेज पाटील, आमदार राजूबाबा आवळे, माजी आमदार राजीव आवळे, डॉ.सुजित मिणचेकर, उल्हास पाटील, शिवसेना संपर्कप्रमुख अरुण दुधवडकर,सहसंपर्कप्रमुख संजय पोवार, जिल्हाप्रमुख संजय चौगुले, माजी पोलीस आयुक्त गुलाबराव पोळ, माजी नगराध्यक्षा विद्याताई पोळ, शहरप्रमुख संदीप पाटील आदी प्रमुख उपस्थित होते.




**महाविकास आघाडीचे उमेदवार सत्यजित पाटील यांच्या आजच्या सभेच्या गर्दीचे रेकॉर्डब्रेक झाले. पालिका चौकासह चारी बाजूंचे रस्ते महालक्ष्मी कॉम्प्लेक्स तसेच अन्य दिसेल त्या इमारतीवर जागा मिळेल तिथे बसून नागरिकांनी आदित्य ठाकरे यांची सभा ऐकण्यासाठी गर्दी केली होती. या सभेस महिला, शेतकरी, युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे पाहून आदित्य ठाकरे यांनी आबा तुम्ही खासदार झालात याचे संकेत असल्याचे सांगितले.**

**पाच वर्षापूर्वी याच नगरपालिका चौकात भर पावसात सभा घेतली होती. त्यावेळी तुम्ही असा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता. मात्र निवडून आल्यानंतर तो गद्दार निघाला. आज याच चौकात मी जाहीरपणे तुमच्या साक्षीने सांगतो गद्दारांना धडा शिकवून आबांना दिल्लीत पाठवा.**

यावेळी बोलताना, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे म्हणाले, युवक, शेतकरी, महिला आणि सर्वसामान्यांच्या विरोधातील भाजपा सरकारला हद्दपार करण्यासाठी जनता सज्ज झाली आहे. हातकणंगले मतदारसंघात खासदार करण्यासाठी याच मंचावर सभा घेतली. या गद्दार खासदाराने कानात गोड बोलून (पान २ वर)

# होय, आहे मी भटकती आत्मा

## लोकांचे दु:ख पाहून अस्वस्थ होतो, काहीही झाले तरी लाचार होणार नाही, पवारांचे मोदींना प्रत्युत्तर

**पुणे :** माझा आत्मा अस्वस्थ आहे हे खरं आहे. पण तो स्वत:च्या स्वार्थासाठी अस्वस्थ नाही, तर लोकांच्या दु:खासाठी अस्वस्थ आहे असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आरोपांवर शरद पवार यांनी प्रत्युत्तर दिले आहे. मंगळवारी शिरुर लोकसभा मतदारसंघात अमोल कोल्हे यांच्या प्रचारासाठी सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत ते बोलत होते.

यावेळी शरद पवारांनी मोदींच्या टीकेवर भाष्य केले आहे. ''पंतप्रधान मोदी यांचा हल्ली माझ्यावर फार राग आहे. एकेकाळी त्यांनी मी शरद पवारांचे बोट धरून राजकारणात आलो असे भाषण केले होते. मात्र आता ते माझ्यावरच टीका करतात. महाराष्ट्रात एक भटकती



आत्मा आहे, ती अस्वस्थ आहे. हा अस्वस्थ आत्मा गेली ४५ वर्षे महाराष्ट्राचं राजकारण अस्थिर करत आहे. तो सरकार अडचणीत आणतो, असे मोदी म्हणतात. माझा आत्मा अस्वस्थ आहे हे खरं आहे. पण तो स्वत:च्या स्वार्थासाठी अस्वस्थ नाही, तर लोकांच्या दु:खासाठी अस्वस्थ आहे. शेतकऱ्यांची दु:ख पाहून आत्मा अस्वस्थ होत असेल तर त्यामध्ये काही गैर नाही'', असा टोला शरद पवारांनी लगावला.

पुढे पवार म्हणाले, ''सध्या संबंध देशातील लोक महागाईने त्रस्त आहेत. त्यांना प्रपंच करणे अवघड झाले आहे. त्यासाठी मी १०० वेळा अस्वस्थ होईन. सामान्य माणसांची भूमिका मांडण्यासाठी आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी काम केले पाहिजे, हे यशवंतराव चव्हाण यांनी आमच्यावर केलेले संस्कार आहेत. या संस्कारांशी मी कधीही तडजोड करणार नाही'', असे शरद पवार यांनी ठणकावून सांगितले.

पुढे पवार यांनी मोदींवर हल्ला करत म्हंटले आहे की, ''मोदी म्हणतात की, मी तडफड करतो. होय, (पान २ वर)

# उद्धव ठाकरे महाराष्ट्राचे महानालायक! - बावनकुळे

**मुंबई :** भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी एक्सवरून टीका करताना उद्धव ठाकरे यांचा महानालायक असा उल्लेख करत उद्धव ठाकरे यांना सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे.

महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ सोलापूरात उद्धव ठाकरे यांची काल सभा झाली. या सभेला संबोधित करताना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर घणाघाती टीका केली. उद्धव ठाकरेंच्या या टीकेनंतर आता भाजपाकडूनही जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले.

महाराष्ट्राचे महानालायक उद्धव ठाकरे यांचा पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि देवेंद्रजींबद्दल बोलताना आज पुन्हा तोल गेला. उद्धव ठाकरेंनी देवेंद्रजींच्या नावानं कितीही शिव्याशाप दिले तरी जनता जनार्दनाचे आशीर्वाद देवेंद्रजींसोबत आहेत. पण उद्धव ठाकरेंचा वाचाळपणा काही थांबायचं नाव घेत नाही. अडीच वर्षे घरात बसून काढली, बोलण्यासाठी एक विकासकामही केलं नाही. मग लोकांसमोर गेल्यावर अशी मुक्ताफळे उधळण्याची वेळ येते, अशा शब्दात चंद्रशेखर बावनकुळे यांनी एक्सवरून उद्धव ठाकरेंच्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. (पान २ वर)

## चांदवडनजीक बस अपघातात पाचपेक्षा अधिक प्रवाशांचा मृत्यू

**नाशिक :** मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर चांदवडलगत मंगळवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात एसटी बसमधील पाच ते सहा प्रवाशांचा मृत्यू तर अनेक जण गंभीररित्या जखमी झाल्याची भीती व्यक्त आहे. मालेगाव-चांदवड दरम्यान सकाळी पावणे दहाच्या सुमारास हा अपघात झाला. अपघातग्रस्त बस जळगावहून वसईकडे निघाली होती.

या अपघातात प्रथमदर्शनी पाच ते सहा प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. एसटी महामंडळाचे पथक घटनास्थळी पोहोचले असून जखमींना चांदवड उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात (पान २ वर)

# पूर्वीचे 'दादा' व आताचे 'दादा' यात खूप फरक : रोहित पवार

**कोल्हापूर :** अजितदादा आमच्या सोबत असताना लोकसभा, विधानसभा निवडणुकीत राज्यभर प्रचार सभा घ्यायचे, पण आता कुठं बसले आहेत, तर सोसायटीमध्ये प्रचार करत बसले आहेत ? अशा शब्दात रोहित पवार यांनी अजित पवारांवर प्रहार केला.

भाजपला जे पाहिजे होते ते त्यांनी केलं. अजितदादा पुरोगामी विचारासोबत, आमच्या बरोबर राहिले असते, तर कदाचित महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले असते पण तसं न करता दादा सोसायटीत प्रचार करतात. पवार साहेबांच्या कार्यावरच अजितदादा प्रश्न उपस्थित करत आहेत. त्यामुळे अजितदादा यांच्या वक्तव्यावर पूर्ण विश्वास ठेवणे म्हणजे वेडेपणा असेल आपल्या सगळ्यांचा असा शब्दात त्यांनी अजित पवारांवर टीकास्त्र सोडले.



पूर्वीचे दादा आणि आताचे दादा यात खूप फरक आहे. पूर्वीच्या दादांचे आम्ही फॅन होतो आताचे दादा भाजपचे आहेत त्यामुळे ते खोटं बोलायला लागले आहेत. १० दिवसांनंतर ते असेही म्हणतील साहेब मुख्यमंत्री नव्हतेच, साहेब कृषीमंत्री देखील नव्हते, साहेब आमदार देखील नव्हते, जो पवार घराण्याचा काळ सुरू झाला तो अजितदादा राजकारणात आल्यापासून सुरू झाला, असेही ते म्हणाले.

रोहित पवार यांनी आमदार शशिकांत शिंदे यांच्यावर दाखल झालेल्या गुन्ह्यावरूनही टीका केली. ते म्हणाले की, आमच्या उमेदवारांवर गुन्हे नाही तर त्यांना जेलमध्ये टाकतील. मला देखील निवडणुकीनंतर जेलमध्ये टाकू शकतात, ही भाजपची प्रवृत्ती आहे. शाहू महाराज यांच्याबरोबर जे जात आहेत त्यांच्यावर कारवाई करत आहेत, भाजप विचित्र डोक्याचं असल्याचे ते म्हणाले. फडणवीस, अजितदादा, एकनाथ शिंदे साहेबांना मोठे मोठे गुंड भेटतात. सर्वसामान्य लोकं भेटू शकत नाहीत पण गुंड भेटतात. या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात गुंड वापरले जात आहेत, भाजप इतक्याच लेबल लावल जात आहे की त्याचा विचारही करू शकत नाही त्यामुळे नागरिकांनी या निवडणुकीमध्ये भाजपला उत्तर द्यावं, असे आवाहन त्यांनी केले.

रोहित पवारांनी रतन टाटांवरूनही अजित पवारांवर तोफ डागली. अजितदादांना मी खूप जवळून पाहिलं आहे त्यांच्याजवळ कॉन्ट्रॅक्टर बिल्डर असतात. दादा आणि उद्योगपतींचे कधी पटलेलं नाही, त्यामुळे रतन टाटा साहेबांच काम किती मोठं आहे हे अजितदादांना कळणार नाही, कारण त्याबाबतीत त्यांची तिथं पोहोचच नाही अशी बोचरी टीका त्यांनी केली. अजितदादा यांना रतन टाटा यांचे कार्य माहीत नसल्यामुळे आणि मोदींना खुश करण्यासाठी ते काय बोलतात यामध्ये गडबड झाली असावी. ही दादांची चूक नाही कारण स्क्रिप्ट दिल्लीवरून येते आणि दादा ती वाचतात, अजितदादा आता जे बोलतात ते स्वतःच काहीच बोलत नाहीत, अशा शब्दात त्यांनी टीका केली.

# कॉँग्रेसला ६० वर्षात जमले नाही ते या सेवकाने १० वर्षात करून दाखवले – पंतप्रधान मोदी

**मुंबई :** महाराष्ट्रातील माढा मतदारसंघात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आज निवडणुकीच्या प्रचाराची सभा घेतली. यावेळी येथील विशाल जनसमुदायाला संबोधित करताना मोदी म्हणाले, भाजप-एनडीए सरकार महाराष्ट्राला विकासाच्या नव्या उंचीवर नेण्याचे काम करत आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले गेल्या १० वर्षात तुम्ही मला जेव्हापासून काम करण्याची संधी दिली मी माझ्या शरीरातील कण न कण तसेच प्रत्येक क्षण तुमच्या सेवेत अर्पण केला आहे. आज देशातील लोक, महाराष्ट्रातील लोक मोदी सरकारची १० वर्षे आणि कॉँग्रेस सरकारची ६० वर्षे यातील फरक बघत आहेत. कॉँग्रेसला जे ६० वर्षात जमले नाही ते तुमच्या या सेवकाने १० वर्षात करून दाखवले आहे.



पंतप्रधान पुढे म्हणाले, महाराष्ट्राची जनता जेव्हा प्रेम आणि आशीर्वाद देते तेव्हा कोणतीच कसर मागे सोडत नाही. मात्र जेव्हा कोणी दिलेले वचन पूर्ण करत नाही तेव्हा महाराष्ट्राची जनता ते लक्षातही ठेवते आणि वेळ आल्यास हिशोबही पूर्ण करते.

पंतप्रधान मोदींनी यावेळी विरोधी पक्षावर हल्लाबोल करताना म्हटले, १५ वर्षापूर्वी एक मोठे नेते येथे निवडणूक लढवण्यासाठी आले होते. तेव्हा त्यांनी मावळत्या सूर्याची शपथ घेऊन म्हटले होते की येथील दुष्काळ प्रभावित क्षेत्रापर्यंत पाणी पोहोचवू मात्र त्यांनी आपले वचन पूर्ण केले नाही. आता त्यांना शिक्षा देण्याची वेळ आली आहे.

पंतप्रधान म्हणाले, विदर्भ असो मराठवाडा असो थेंबथेब पाण्यासाठी वाट पाहायला लावण्याचे पाप गेल्या अनेक वर्षापासून होत आहे. कॉँग्रेसला देशाने ६० वर्षे राज्य करण्याची संधी दिली. या ६० वर्षात जगातील अनेक देश पूर्णपणे बदलले मात्र कॉँग्रेसला शेतकऱ्यांच्या शेतीपर्यंत पाणी पोहोचवता आले नाही. २०१४मध्ये साधारण १०० सिंचन योजना अशा होत्या ज्या अनेक दशकांपासून तशाच होत्या. यातील २६ योजना महाराष्ट्रातील होत्या. विचार करा किती मोठा धोका कॉँग्रेसने महाष्ट्राला दिला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, २०१४मध्ये सरकार बनल्यानंतर मी पूर्ण शक्ती सिंचन योजनांवर लावली. कॉँग्रेसने लटकवलेल्या १०० योजनांपैकी ६३ योजना आम्ही पूर्ण केल्या. प्रत्येक शेतात, प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहोचवणे हे माझ्या जीवनाचे मोठे मिशन आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले, मोदी गावातील आपल्या बहिणींना सशक्त करण्यामध्ये गुंतले आहेत. गेल्या १० वर्षात आमच्या प्रयत्नांनी एक कोटी लखपती दीदी बनल्या आहेत. आता मोदींची ही गॅरंटी आहे की मी ३कोटी बहिणींना लखपती बनणार आहे. आधी दिल्लीतून शेतकऱ्यांच्या नावावर थोडे जरी पैसै निघत होते तेव्हा कॉँग्रेसचा पंजा ते लुटत होता मात्र दिल्लीत बसलेला तुमचा मुलगा आहे.

# मुंबईतील आणखी एक जागा शिंदेंच्या पारड्यात

## रवींद्र वायकरांना उत्तर पश्चिम मुंबईतून उमेदवारी

**मुंबई :** ठाकरे गटातून शिंदे गटात गेलेले रविंद्र वायकर यांना उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर झाली आहे. रविंद्र वायकर हे जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आहेत. त्यामुळे आता ठाकरेंच्या अमोल कीर्तिकरांविरोधात शिंदेंच्या रविंद्र वायकरांचा सामना रंगणार आहे.

शिवसेनेचे कट्टर नेते रविंद्र वायकर यांनी गेल्या महिन्यांत शिंदे गटात प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशानंतर त्यांना लोकसभेचं तिकिट मिळणार असल्याची चर्चा सुरू झाली होती. या जागेवरून ठाकरे गटाकडून अमोल कीर्तिकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर, अमोल कीर्तिकर यांचे वडील आणि शिंदे गटाचे ज्येष्ठ नेते गजानन कीर्तिकर हे या मतदारसंघाचे विद्यमान खासदार आहेत. अमोल यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर गजानन कीर्तिकर यांनी निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे महायुतीतून या जागेवरून कोणाला उमेदवारी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष होते. दरम्यान, रामदास कदम यांच्या मुलाचेही नावही या जागेसाठी चर्चेत होत. यावरून कीर्तिकर आणि कदम यांच्यात शाब्दिक युद्धही रंगले होते. परंतु, महायुतीतून कोणाचंही नाव जाहीर करण्यात आले नाही. अखेर, महायुतीने आता रविंद्र वायकर यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

वायकर यांची अलीकडेच ईडीने सखोल चौकशी केली होती. जोगेश्वरीत राखीव भूखंडावर हॉटेल उभारून आर्थिक फायदा उकळल्याबद्दल वायकर यांच्या विरोधात ईडीने चौकशी सुरू केली आहे. या प्रकरणात त्यांच्या पत्नीच्या विरोधातही गुन्हा दाखल झाला आहे. वायकर हे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे एकेकाळी निकटवर्तीय मानले जात असत. मुंबई महानगरपालिकेची आर्थिक तिजोरी समजल्या जाणाऱ्या स्थायी समितीचे वायकर यांनी अध्यक्षपदही भूषविले होते. ठाकरे व वायकर कुटुंबीयांनी रायगड जिल्ह्यात (पान २ वर)

# बहीण-भावाच्या प्रतिष्ठेची लढाई

उत्तर प्रदेशात काँग्रेसची कामगिरी फारच खालावली आहे. समाजवादी पक्षाशी युती करूनही काही फायदा होईल का, याबाबत साशंकता आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशची जबाबदारी प्रियांका गांधी यांच्याकडे असतानाही त्यांना तिथे फारशी चमकदार कामगिरी करता आली नव्हती. देशातील सत्तेचा मार्ग उत्तर प्रदेशातून जातो. तिथे लोकसभेच्या ऐंशी जागा असताना त्याकडे काँग्रेसचे दुर्लक्ष झाले आहे. गेल्या निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर राहुल गांधी अमेठी मतदारसंघाकडे फिरकले नाहीत, तर प्रकृती अस्वास्थ्यामुळे सोनिया गांधी यांना त्यांच्या रायबरेली मतदारसंघासाठी पुरेसा वेळ देता आला नाही. त्यातच सरकारविरोधात असल्याने त्यांना तिथे फारशी विकासाची कामे करता आली नाहीत. उत्तर प्रदेशात काँग्रेस समाजवादी पक्षाच्या साथीने १७ जागा लढवत आहे. अमेठीवर प्रियांकाचे पती रॉबर्ट वधेरा यांचा डोळा आहे. त्यांनी वारंवार निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे; परंतु कुटुंबवाद आणि घराणेशाहीची टीका तसेच राजस्थान, हरयाणातील भूखंड खरेदीचे भूत अजून त्यांच्या मानगुटीवर कायम आहे. त्यामुळे त्यांना उमेदवारी देऊन काँग्रेस भाजपच्या हाती आयते कोलित देणार नाही. वायनाडमधील निवडणुकीत राहुल गांधी यांच्या विजयाची खात्री नसल्यानेच राहुल अन्य ठिकाणी उमेदवारी अर्ज दाखल करतील, अशी शंका पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित केली आहे. वायनाड लोकसभा मतदारसंघाची निवडणूक आता संपली आहे. चौथ्या टप्प्यातील निवडणूक आता सुरू होणार आहे. त्यासाठी तीन मे पासून अर्ज भरण्यास सुरुवात होणार आहे. त्यात अमेठी आणि रायबरेली या मतदारसंघाचा समावेश आहे. राहुल आणि प्रियांका यांनी देशभर दौरे केल्याने आता त्यांना उत्तर प्रदेशात प्रचाराला वेळ मिळणार आहे. राहुल आणि प्रियांका उमेदवार असतील, तर अन्य मतदारसंघातील उमेदवारांना थोडा धीर मिळेल. त्यामुळे या दोघांनी उभे राहावे, असा पक्षातून सूर आहे. सोनिया गांधी यांची राज्यसभेवर निवड झाली आहे. राहुल आणि प्रियांका खासदार म्हणून निवडून आले, तर एकाच कुटुंबातील तिघे खासदार होतील आणि भाजपला कुटुंबवादाचा प्रचार करण्याची संधी मिळेल. भारतीय जनता पक्षातही एका कुटुंबात अनेक पदे आहेत. विशेषतः भाजपच्या मित्रपक्षात तर कुटुंबवाद पुरेपूर भरला आहे; परंतु दुसऱ्याच्या डोळ्यांत कुसळ दिसत असताना स्वतःच्या डोळ्यातील मुसळ दिसत नाही.

लोकसभा निवडणुकीसाठी दोन टप्प्यात मतदान झाले आहे. त्यानंतर अमेठी आणि रायबरेली जागांसाठी उमेदवार जाहीर करणार असल्याच्या बातम्या येत होत्या. दोन्ही जागांबाबत जोरदार चर्चा सुरू आहे. अमेठी आणि रायबरेलीमधून उमेदवार कोण? हा काँग्रेससमोर मोठा प्रश्न आहे. काँग्रेस पक्षाचे सत्ताकेंद्र असलेल्या अमेठीतील काँग्रेस कार्यालयाचे रंगकाम सुरू आहे. 'राहुल बिन अमेठी सून'चे पोस्टर तिथे दिसू लागले आहेत. नेत्यांचा मेळाही दिसू लागला आहे, कारण अशी बातमी आहे की, राहुल गांधी लवकरच अमेठीत तळ ठोकणार आहेत आणि ते येथून निवडणूक लढवणार आहेत. खुद्द राहुल गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनीही तसे संकेत दिले आहेत. अमेठीबाबत मला जो काही आदेश मिळेल, तो कार्यकारिणीच्या बैठकीत ठरवला जाईल, असे राहुल यांनी म्हट१ले आहे. त्याचवेळी काँग्रेसचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल यांनीही एक-दोन दिवसांत अमेठी आणि रायबरेलीच्या जागांबाबत सर्व काही स्पष्ट होईल, असे म्हटले आहे. अमेठीची लढाई जिंकण्यासाठी स्मृती इराणी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. त्यांनी राम मंदिरात रामाचे दर्शन घेऊन सुरुवात केली आणि त्यानंतर अमेठीतील अनेक मंदिरांमध्ये पूजा केली. जोरदार प्रचारासोबतच स्मृती इराणी काँग्रेसवरही हल्लाबोल करत आहेत आणि अमेठीतील कामांचा लेखाजोखाही मांडत आहेत. अमेठी ही केवळ लोकसभेची जागा नाही, तर राजकारणातील गांधी कुटुंब आणि काँग्रेसच्या वर्चस्वाचा तो पुरावा आहे. संजय गांधी, राजीव गांधी आणि सोनिया गांधी हे अमेठीतून खासदार राहिले आहेत. देशाच्या राजकारणात काँग्रेस जेव्हा शिखरावर होती, तेव्हा अमेठीत काँग्रेसचे नाणे वापरले जायचे. आज काँग्रेस उपेक्षित आहे आणि त्याचा परिणाम अमेठीतही दिसून येत आहे. गेल्या ४२ वर्षांत अमेठीमध्ये ११ निवडणुका आणि दोन पोटनिवडणुका झाल्या आहेत. त्यापैकी ११ निवडणुका काँग्रेसने जिंकल्या आहेत. भाजपला केवळ दोन निवडणुकांमध्ये अमेठी जिंकता आली आहे. १९९८ आणि २०१९ मध्ये फक्त अमेठीतून भाजपने विजय मिळवला आहे. त्यामुळे अमेठीतील पराभवाचे दुखणे काँग्रेसच्या मनात अजूनही आहे आणि स्मृती इराणींचा उल्लेख आल्यावर ही वेदना वाढते. स्मृती इराणी यांनी काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात काँग्रेसचे भविष्य म्हणजे राहुल गांधी यांचा पराभव केला. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने स्मृती इराणी यांना राहुल गांधी यांच्या विरोधात उभे केले होते. सत्ताविरोधी, भ्रष्टाचार, महागाई आणि यूपीए सरकारच्या मोदी लाटेनंतरही राहुल गांधी यांनी अमेठीची जागा वाचवली. तथापि, २००९ मध्ये राहुलच्या विजयाचे अंतर ३.७ लाख होते. ते २०१४ मध्ये १.०७ लाखांवर आले आणि शेवटी २०१९ मध्ये स्मृती इराणी यांनी राहुल गांधींचा ५५ हजार मतांनी पराभव केला. २०१९ मध्ये स्मृती इराणी यांचा विजय हा एका निवडणुकीच्या लाटेचा परिणाम नव्हता, त्यांनी अमेठीच्या प्रत्येक भागात पद्धतशीरपणे राहुल गांधींच्या मतदारांमध्ये घुसखोरी केली. प्रथम २०१४ मध्ये पराभवाचे तो२०१२ च्या विधानसभा निवडणुकीत कमी झाला आणि तो जवळपास ३० टक्क्यांवर आला. २०१७ च्या विधानसभा निवडणुकीत ते २५ टक्क्यांहून कमी झाले. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाने आतापर्यंतची सर्वात कमी १४ टक्के टक्केवारी गाठली. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने अमेठीतील दोन मतदारसंघ जिंकले. तसेच प्रत्येक जागेवर विजयाचे अंतर अंदाजे २२ हजार ते ७७ हजारांपर्यंत होते.

राहुल गांधी यांची अमेठीमधून निवडणूक लढवण्यास फार इच्छुक नाहीत. २०१९ च्या निवडणुकीत स्मृती इराणी यांनी आश्वासन दिले होते, की त्या अमेठीतून जिंकल्या तर जनतेला त्यांना भेटण्यासाठी दिल्लीला जावे लागणार नाही. स्मृती यांनी गेल्या दोन महिन्यांपूर्वी अमेठीमध्ये आपले घर बांधले. त्यांनी गृहप्रवेशासाठी २२ हजार लोकांना आमंत्रण पत्रे पाठवली गेली. स्मृती इराणींचा हा प्रयत्न लोकसभा निवडणुकीपूर्वी अमेठीमध्ये मोठा संदेश देणारा असल्याची चर्चा होती. इराणी यांनी २०२० ते २०२३ पर्यंत अमेठीचे डझनभराहून अधिक दौरे केले आहेत. राहुल यांनी २०१९ च्या पराभवानंतर अमेठीपासून स्वतःला दूर ठेवले. १८ डिसेंबर २०२१, २५ फेब्रुवारी २०२२ रोजी त्यानंतर १९ फेब्रुवारी २०२४ रोजी अशा पाच वर्षात तीन भेटी राहुल यांनी अमेठीला दिल्या. कोरोनाच्या काळात त्यांनी अमेठीमध्ये ऑक्सिजनची व्यवस्था केली होती. १६ एप्रिल रोजी राहुल यांनी केरळच्या वायनाडमध्ये दिलेल्या भाषणात मी जेव्हाही वायनाडला येतो, तेव्हा तुम्ही मला असे भासवता, की मी घरी आलो आहे. त्यावरही इराणी यांनी टीका केली होती. १५ वर्षे जिंकल्यानंतरही राहुल अमेठीतून गायब होते आणि हरल्यानंतर पाच वर्षे पळून गेले, या शब्दांत स्मृती इराणी यांनी टीका केली. अलीकडच्या काळात वायनाडची जवळीक दाखवण्यासाठी अमेठीचा पारंपारिक बालेकिल्लाही काँग्रेसच्या हातातून निसटत आहे. डॉ. संजय सिंह २०१९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर भाजपमध्ये दाखल झाले. २०१७ मध्ये जंग बहादूर सिंह यांनी काँग्रेस सोडून भाजपमध्ये प्रवेश केला. यंदा स्मृती इराणी यांच्या उपस्थितीत काँग्रेसचे माजी प्रदेश सरचिटणीस राजेश्वर सिंह यांच्यासह डझनभर काँग्रेस कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. अशा परिस्थितीत राहुल गांधी यांनी अमेठीतूनही निवडणूक लढवली तर ते त्यांच्यासाठी मोठे आव्हान ठरणार आहे. उत्तर प्रदेशात काँग्रेसच्या वाट्याला १७ जागा आल्या आहेत. त्यांना समाजवादी पक्षाच्या पारंपारिक व्होट बँक आणि केडरचा आणि त्याच्या भावनिक मतदारांचा पाठिंबा मिळण्याबाबत साशंकता व्यक्त होत आहे. उत्तर प्रदेश सरकारने अमेठीतील संजय गांधी रुग्णालय सील केले होते. हे प्रकरण उच्च न्यायालयात पोहोचले. त्यानंतर उच्च न्यायालयाने रुग्णालय सुरू करण्याच्या सूचना दिल्या. सरकारच्या या वृत्तीबद्दल स्थानिक लोकांमध्ये नाराजी आहे, याचा फायदा राहुल गांधींना होऊ शकतो. पक्षाच्या अंतर्गत सर्वे क्षणात राहुल यांना फायदा होईल, असे सांगितले गेले. १५ एप्रिलपूर्वी काँग्रेसने उत्तर प्रदेशातील अमेठी आणि रायबरेली या दोन्ही जागांवर अंतर्गत सर्वेक्षण केले. त्यात पक्षाला सकारात्मक संकेत मिळाले आहेत. अहवालात दोन्ही जागांवर गांधी घराण्यातील व्यक्तींनाच उमेदवारी देण्यावर भर देण्यात आला आहे. काँग्रेस पक्षाने रायबरेलीतून राहुल गांधी आणि अमेठीतून प्रियंका गांधी यांना उमेदवारी द्यावी, असा सिद्धांत आहे. रायबरेलीत भाजपने अद्याप उमेदवार जाहीर केलेला नाही. या जागेवरून भारतीय जनता पक्ष वरुण गांधी यांनाही उमेदवारी देऊ शकतो, अशी चर्चा आहे. भावा-बहिणीतील लढत टाळण्याचा दोन्ही काँग्रेसचा प्रयत्न आहे.

## धैर्यशील माने यांचा विजय निश्चित - डॉ. अरविंद माने

### भारतीय जनता युवा मोर्चाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मतदारसंघ काढला पिंजून

**शिरोळ/प्रतिनिधी**

देशाचा शाश्वत विकास करणे म्हणजेच पंतप्रधान नरेंद्र मोदींची गॅरंटी आहे सर्वसामान्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी शासनाच्या विविध योजनेचा लाभ जनतेला देऊन त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या केंद्र सरकारने केले आहे यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशाचे तिसऱ्यांदा पंतप्रधान व्हावेत यासाठीच जनतेचे पाठबळ त्यांना मिळत आहे यामुळे हातकलंगले लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार धैर्यशील माने हे एक लाखाहून अधिक मताधिक्याने विजयी होतील असा विश्वास भारतीय जनता युवा मोर्चा कोल्हापूर जिल्हा ग्रामीण पूर्वचे अध्यक्ष व शिरोळचे माजी नगरसेवक डॉ अरविंद माने यांनी प्रचार दौऱ्या दरम्यान व्यक्त केला आहे.



महायुतीचे उमेदवार खासदार धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ डॉ अरविंद माने यांनी हातकणंगले लोकसभा मतदारसंघात भारतीय जनता युवा मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या समवेत प्रचार दौरा सुरू केला आहे महायुतीचा जाहीरनामा घराघरात पोहोचवण्यासाठी ते थेट मतदारांच्या संपर्कात जात आहेत यामुळे खासदार माने यांचे धनुष्यबाण हे चिन्ह घराघरात पोहोचले आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले काम हे सर्वसामान्यांच्या विश्वासास पात्र ठरले आहे बलशाली आणि विकसित भारत बनण्यासाठी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदीच व्हावेत यासाठी भारतीय जनता युवा मोर्चाचे सर्व पदाधिकारी मतदारसंघातील सहाही विधानसभा मतदारसंघात तळ ठोकून आहेत त्यांनी प्रचाराची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतली आहे महायुतीच्या प्रचाराला जनतेचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेली किसान सन्मान योजना अन्नसुरक्षा योजनेतून मोफत धान्य पुरवठा उज्वला योजनेतून गॅस पुरवठा पंतप्रधान घरकुल आवास योजना या सर्वसामान्यांच्या हिताच्या योजना राबवत देश प्रगतीपथावर नेला आहे. यामुळेच महायुतीच्या उमेदवारांना मतदारांच्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यामुळेच हातकणंगले लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार खासदार धैर्यशील माने यांना जनतेची पसंती असल्यामुळे ते एक लाखाहून अधिक मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास डॉ अरविंद माने यांनी प्रचार बैठकीत व्यक्त केला.

त्यांनी या लोकसभा मतदारसंघातील सर्व नव मतदारांनी आपल्याला घटनेने दिलेला मतदानाचा पवित्र हक्क बजावून लोकशाही बळकट करण्यासाठी साथ द्यावी, असे आवाहनही यावेळी केले.

## हक्काच्या घरासाठी आता न्यायालयात जाणार

**मुंबई/प्रतिनिधी**

" कुणी घर देता का घर " अशी खंत चित्रपटात नाटकात आपण पाहत असतो. मात्र घाम गाळून जमा केलेली कष्टाची कमाई जर विकासक गिळंकृत करत असेल तर आम्ही काय करायचे ? पोलीस स्टेशन मध्ये न्याय मिळत नाही म्हणून आता आम्ही न्यायालयात जाणार असा इशारा घराची फसगत झालेल्या ग्राहकांचे प्रमुख निकेश रावल आणि अब्बास कुरेशी यांनी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिला.

मुंबई चेंबूर येथे एका विकासकाने बांधकाम केलेल्या इमारतीमध्ये घर खरेदी करणाऱ्या शेकडो ग्राहकांची आर्थिक फसवणूक केली आहे. या सर्व ग्राहकांनी पोलिसांत तक्रार नोंदवली होती मात्र




अद्यापही कारवाई झालेली नाही. कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशानंतरही विकासकावर कारवाई झाली नाही. त्यामुळे आता उच्च न्यायालयात जाणार व ग्राहकांना न्याय मिळून देणार असे निकेश रावल आणि अब्बास कुरेशी यांनी सांगितले.

आमच्या सोबत खरेदीदारांची ही फसवणूक केली आहे ११ फ्लॅट पैकी ०२ फ्लॅट चे रजिस्ट्रेशन करून दिले आणि उर्वरित ०९ फ्लॅट च्या 'अलॉटमेंट लेटर' आणि 'डीड ऑफ कॅन्शलेशन' यामध्ये फ्लॅट एरिया, फ्लॅट नंबर यांमध्ये तफावत आहे. तसेच अलॉटमेंट लेटर दिल्यानंतर फ्लॅट हे दुसऱ्याच व्यक्तींना रजिस्ट्रेशन करून विक्री केले. त्यामुळे पोलिसांनी व संबंधितांनी या प्रकरणी आम्हाला न्याय द्यावा अशी मागणी रहिवाश्यांनी यावेळी केली.

## जगद्गुरू शंकराचार्यांच्या उपस्थितीत आज महाकुंभाभिषेक सोहळा

**मुंबई/प्रतिनिधी**

हरिहरपुत्र भजन समाज संचलित 'शंकरालयम' मुंबई चेंबूर येथे आज १ मे रोजी तृतीय जीर्णोद्वार महाकुंभाभिषेक सोहळा आयोजित केला असल्याची माहिती मुंबई प्रेस क्लब येथे आयोजित पत्रकार परिषदेत शंकरालयमचे अध्यक्ष जयंत लापसिया यांनी दिली.




हा महाकुंभाभिषेकम आद्य जगद्रुरु बदरी शंकराचार्य श्री विद्याभिनव श्री श्री कृष्णानंद तीर्थ महा स्वामीगळ श्री क्षेत्र शकटपुरम (कर्नाटक) यांच्या करकमलाद्वारे संपन्न होणार आहे. २००२ आणि २०१४ साली महा-कुंभाभिषेकमाचे शंकरालयम येथे जगदगुरुंच्याच हस्ते आयोजन करण्यात आले होते. यंदाचे हे तिसरे वर्ष आहे.

कोविडमुळे आणि त्यानंतर जाहिर करण्यात आलेल्या प्रतिबंधामुळे हा महाकुंभाभिषेकम सोहळा लांबला होता. यंदा भारतातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा महाकुंभाभिषेकम सोहळा आयोजित करण्यात आला आहे. महाकुंभाभिषेकम सोहळ्याचे धार्मिक विधी अग्रगण्य पुरोहित ब्रम्हश्री लक्ष्मीनारायणा सोमय्याजी आणि त्यांचे सहकारी पार पाडतील तर महाकुंभाभिषेकम पुर्व सोहळ्याचे धार्मिक रामासुब्बू आणि त्यांचे सहकारी पार पडतील.

ज्या भक्त-श्रद्धाळूंना केरळमधील अय्यपाच्या म्हणजेच शबरीमाला सारख्या पवित्र स्थानी जाने शक्य होत नाही त्यांनी 'शंकरालया'ला भेट देऊन आपल्या मनोकामना पूर्ण करून घ्याव्यात असा सल्ला आद्य श्री शंकराचार्य यांनी दिला आहे. अशी माहिती जयंत लापसिया यांनी दिली.

## पान १ वरून

### होय, आहे मी भटकती आत्मा

मी लोकांचे दुःख पाहून तडफडतो. मला कितीही किंमत मोजावी लागली तरी चालेल पण मी लाचार होणार नाही. महाराष्ट्र लाचार होणार नाही. भाजपने आमचे घर फोडले, पक्ष फोडला, अनेक वर्षे काम करण्याची संधी दिलेल्या लोकांना फोडले. हे फोडाफोडीचे राजकारण महाराष्ट्राच्या हिताचे नाही'', अशी टीका पवारांनी केली आहे.

याशिवाय पवारांनी भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. ''जनतेला अडचणीतून दूर करण्यासाठी सत्तेचा वापर करायचा असतो, इथे अडचणीत आणण्यासाठी सत्तेचा गैरवापर केला जात आहे. पंतप्रधान काल म्हणाले मी ईडीचा एक टक्काही वापर करत नाही. मात्र त्यांनी काहीही म्हणू दे. त्यांच्या सरकारने हुकूमशाहीच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे'', असे शरद पवार यांनी म्हटले आहे.

### विकासकामात टक्केवारी खाणाऱ्या गद्दार खासदारांना जेलची हवा खायला लावणार : आदित्य ठाकरे

निधी घेतला मात्र हा निधी कोठे गेला. विकासकामात टक्केवारी खाणार्या या गद्दार खासदारांना सत्ता आल्यावर जेलची हवा खायला लावणार आहे. शिवसेनेची परंपरा सामान्याला असामान्य पदापर्यंत नेण्याची आहे. या निवडणुकीत सर्वसामान्यांचा आवाज असलेले निष्ठावंत सत्यजित पाटील यांना उमेदवारी दिली आहे त्यांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी माजी सामाजिक मंत्री चंद्रकांत हंडोरे म्हणाले, देशाच्या संविधाना नख लावण्याचे काम भाजप करत आहे. भाजपने वेळोवेळी घटनेची पायमल्ली केली आहे. पक्ष फोडाफोडी करून नियमबाह्य सरकार बनविले. जनतेच्या मनात या भाजपा सरकारबद्दल प्रचंड राग आहे आणि तो या निवडणुकीत दिसणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी उमेदवार सत्यजित पाटील, आम. राजूबाबा आवळे, माजी आम. राजीव आवळे, डॉ.सुजित मिनचेकर, संजय चौगुले, माजी पोलीस आयुक्त गुलाबराव पोळ व अन्य मान्यवरांनी मनोगत व्यक्त केली. यावेळी मोठ्या संख्येने महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चांदवडनजीक बस अपघातात पाचपेक्षा अधिक प्रवाशांचा मृत्यू

आले आहे. अपघातात किती प्रवाशांचा मृत्यू झाला वा, किती जखमी झाले, याची स्पष्टता काही वेळात होईल, असे एसटी महामंडळाचे वाहतूक अधिकारी किरण भोसले यांनी सांगितले. वसई आगाराची ही बस होती. जळगावहून ती वसईला निघाली होती. सकाळी पावणेदहाच्या मालेगावहून ती नाशिककडे जात असताना हा अपघात झाला.

चांदवडलगतच्या घाटात देवी मंदिराच्या पुढे उताराचा रस्ता आहे. तिथे एका वाहनाला ओव्हरटेक करीत असताना हा अपघात झाल्याचे सांगितले जाते. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांसह पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अनेक प्रवासी गंभीररित्या जखमी झाल्याचे प्रत्यक्षदर्शीकडून सांगण्यात आले. जखमींना चांदवडच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### उद्धव ठाकरे महाराष्ट्राचे महानालायक! - बावनकुळे

ठाकरे हे आता नैराश्याच्या गर्तेत गेले आहेत. त्यांची ही वायफळ बडबड त्यांच्या पक्षातील उमेदवारांना आणि त्यांच्या नेत्यांना सुद्धा नकोशी झाली असल्याचेही बावनकुळे म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी आता एक लक्षात ठेवावे की, तुम्ही मोदीजी आणि देवेंद्रजींबद्दल कितीही वायफळ बडबड करा, मात्र ४ जून रोजी जनता तुम्हाला तोंड दाखवायलाही जागा ठेवणार नाही, असेही चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

पुढे बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी रामदास स्वामींनी लिहिलेल्या काही ओळींचा आधार घेत उद्धव ठाकरेंवर तोफ डागली आहे. तोंडाळासीं भांडों नये` वाचाळासीं तंडोंनये` संतसंग खंडू नये अंतर्यामीं असे रामदास स्वामींनी लिहिलेल्या 'मुर्खांची लक्षणे' या ओळींचा वापर करत बावनकुळे यांनी उद्धव ठाकरेंचा खरपूस समाचार घेतला.

### मुंबईतील आणखी एक जागा शिंदेंच्या पारड्यात

बेहिशेबी मालमत्ता केल्याचा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला होता. जोगेश्वरीमध्ये राखीव भूखंडावर वायकर यांनी आधी क्लब व नंतर हॉटेलचे बांधकाम सुरू केले होते. यातून वायकर यांनी पैशांचा अपहार केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे.

## लोकलमधून पडून २६ वर्षीय डोंबिवलीकर तरुणीचा मृत्यू

**मुंबई** : मध्य रेल्वेच्या कोपर आणि दिवा स्थानकादरम्यान धावत्या लोकलमधून पडून एका २६ वर्षीय तरुणीने प्राण गमावल्याचा धक्कादायक प्रकार सोमवारी घडला. मरण पावलेल्या तरुणीचं नाव रिया राजगोर असे असून ती डोंबिवलीत राहत होती. गर्दीमुळे लोकलच्या डब्यात आतमध्ये शिरता न आल्याने रिया धावत्या लोकलमधून कोपर आणि दिवा स्थानकादरम्यान पडली. या दुर्घटनेत तिला गंभीर दुखापत झाली आणि त्यातच तिला मृत्यू झाला.

रिया ही ठाण्यामधील एका बांधकामासंदर्भातील कंपनीमध्ये कामाला होती. सोमवारी तिने डोंबिवली स्थानकामधून ठाण्याच्या दिशेला जाणारी अप मार्गावरील लोकल ट्रेन पकडली. ट्रेनला गर्दी होती. मात्र थोडे पुढे गेल्यानंतर आतमध्ये जागा होईल आणि आपण आत सरू असे वाटल्याने रियाने फुटबोर्डवर उभे राहून प्रवास सुरु केला. लोकलने वेग पकडल्यानंतर कोपर स्थानकाजवळ तिचा तोल गेला आणि ती रुळावर पडली. तिच्या डोक्याला इतक्या जोरात दणका बसला की जागीच तिने प्राण सोडला.

## प्राणापलीकडे लोकशाही जपण्याची वेळ आली आहे - मधू मंगेश कर्णिक

**मुंबई/प्रतिनिधी**

सर्वांनी न चुकता मतदान करा असे आवाहन करत, प्राणापलीकडे लोकशाही जपण्याची वेळ आली आहे असे स्पष्ट मत ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांनी जेष्ठ पत्रकार मधुकर भावे यांच्या " मागे वळून पाहताना " या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्या प्रसंगी मांडले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर भावे यांच्या प्रेमापोटी उपस्थित होते.




लोकमत समूहाचे राजेंद्र दर्डा व विजय दर्डा , मा.खा. रामशेठ ठाकूर, आचार्य अत्रे यांचे नातू राजेंद्र प्रसाद पै, मंगल गाणी फेम अशोक हंडे, पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र बाभळे, विश्वात राही भिडे, कार्यवाह संदीप चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मधू मंगेश कर्णिक यांनी सांगितले की, भावे यांच्या आईने भावे मुंबईला नोकरीसाठी निघाले असताना दिलेल्या कंदिलाच्या प्रकाश भावे यांनी ६५ वर्ष पत्रकारिता केली हि खूप मोठी गोष्ट आहे. आचार्य अत्रे यांच्या सावलीत मधुकर भावे यांची वाढ झाली. ६५ वर्षापूर्वीच्या महाराष्ट्रात काय परिस्थिती होती याची सर्व माहिती या पुस्तकात आहे. संस्कार बाजारात विकत मिळत नाहीत भावे यांच्या न शिकलेल्या आईने त्यांच्यावर संस्कार केले. समाजाबरोबर जो चालतो तो खरा पत्रकार असतो. भावे यांनी समजाबरोबर चालत पत्रकारिता केली. असे कर्णिक यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

मधुकर भावे यांच्या आठवणींचा किस्सा सांगत पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र बाभळे यांनी चारोळ्या ऐकवल्या व भावे यांचा या वयातही कार्यरत आहेत याबाबत यांचे कौतुक केले. त्याचा १०० वा वाढदिवस याच सभागृहात आपण साजरा करूया असे ते म्हणाले.

मधुकर भावे यांच्या सोबत आठवणीच्या विश्वात रमले की एकही आठवण रिपीट होत नसते असे संदीप चव्हाण यांनी सांगितले. भावे यांच्या पुस्तकात असे राजकारणी आहेत की तसे राजकारणी पुन्हा होणार नाहीत आणि मधुकर भावे यांच्यासारखे लेखक पुन्हा होणार नाहीत असे संदीप चव्हाण आपल्या भाषणात म्हणाले.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# शरद पवारांबद्दलचे पंतप्रधानांचे वक्तव्य दुर्दैवी

## काँग्रेसचे जेष्ठ नेते उल्हास पवार यांची खंत; मोदींनी आत्मविश्वास गमावल्याचीही टीका

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुण्यातील सभेत ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा जो उल्लेख केला तो दुदैवी असून निषेधार्य आहे. शरद पवारांना त्यांनी यापूर्वी गुरू आहेत, असे संबोधिले होते. ते जर खरेच गुरू असतील तर गुरू बद्दल असे शब्द वापरणे योग्य नाही, अशी खंत काँग्रेसचे जेष्ठ नेते माजी आमदार उल्हास पवार यांनी व्यक्त केली. पवारांबद्दल मोदींनी वापरलेले शब्द पाहता राजकारणाचा स्थर किती घसरला आहे, हे कळते. मोदींची ही भाषा राजकीय़ संस्कृतीसाठी दुर्दैवी असून गेल्या दहा वर्षातकेवळ जुमलेबाजी केल्याने मोदींना नागरिकांचा प्रतिसाद मिळत नाही, त्यांच्या सभांना गर्दी होत नाही, खुर्च्या मोकळ्या असतात, त्यामुळे मोदी आत्मविश्वास गमावत आहेत, अशी टिकाही पवार यांनी केली.




पुण्यातील रेसकोर्स मैदानावरील सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शरद पवार यांचे नाव न घेता, भटकती आत्मा असा उल्लेख करत हा आत्मा राज्य, घर आणि देश अस्थिर करत असल्याची टीका केली होती. या पार्श्वभूमीवर काँग्रेस भवन येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेमध्ये उल्हास पवार यांनी मोदींच्या वक्तव्याचा निषेध करत खंत व्यक्त केली. तसेच मोदी व भाजपच्या कार्यपद्धतीवर सडकून टिका केली. ते म्हणाले, जुमलेबाजीमुळे त्यांच्यासभेला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यांच्या सभांना निम्म्यापेक्षा अधिक खुर्च्या मोकळ्या रहात आहेत. पंतप्रधान लोकसभा किंवा विधानसभेला एखाद्या राज्यात पाच सात सभा घेतात, मात्र मोदी एका राज्यात महापालिकेच्या निवडणुकीसारखे एका जिल्ह्यात दोन दोन सभा घेत आहेत. याचा अर्थ त्यांनी आत्मविश्वास गमावला आहे. स्वत:च्या राज्यात सभा घ्यावी लागते. सत्तर वर्षात काँग्रेसने काय केले यापेक्षा गेल्या दहा वर्षात त्यांनी काय केले, हे आता सांगावे. सातशे वीस शेकऱ्यांचा मृत्यू झाला, त्यांच्या श्रद्धांजलीचा प्रस्ताव नाकारला, हा असंवेदनशिलतेचा कळस आहे. मोदींनी गुजरातचे मुख्यमंत्री झाल्यापासून आजपर्यंत एकही पत्रकार परिषद घेतली नाही.

मोदींचे तीन तीन मंत्री आम्ही राज्य घटना बदलणार असल्याचे सांगतात, आणि मोदी म्हणतात, मी घटना बदलणार नाही. कालच्या सभेतील त्यांचे भाषण पायाखालची वाळू घरली आहे हे सिद्ध करणारे होते. त्यांचा अभ्यास नाही, त्यांना देशाच्या इतिहासाचे ज्ञान नाही, चुकीचा इतिहास सांगतात, हा माणूस दहा वर्षात कधी चीन शब्द उच्चारत नाहीत, ते चिनला एवढे का भितात, कळत नाही.

मोदींनी प्रत्येकाच्या डोक्यावर सव्वा लाखाचे कर्ज करून ठेवले आहे. सत्तार हजार कोटीच्या भ्रष्टाचारावर मोदींनी पुण्यातील सभेत बोलायला हवे होते, ज्यांच्याबद्दल मोदी बोलले होते, ते काल त्यांच्या शेजारी बसले होते. देशात दुही माजवण्याचे काम कोण करतंय ते जनतेला माहिती आहे. महिलांच्या अत्याचारावर पंतप्रधान बोलायला तयार नाहीत. महिलांवर अत्याचार करणारे त्यांचे आमदार, नेते अडकले आहेत. हिंदू धर्माचा उदो उदो करणाऱ्या मोदींनी श्री रामाच्या प्राणप्रतिष्ठापनेच्या वेळी रामाचा व तिर्थाचा आपमान केला, असेही उल्हास पवार म्हणाले.

यावेळी प्रदेश उपाध्यक्ष व लोकसभा निवडणूक प्रचार प्रमुख मोहन जोशी, प्रदेश सरचिटणीस ॲड. अभय छाजेड, राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी, राज अंबिके आदी उपस्थित होते.

# निवडणुकीचा 'संग्राम' हा देश एकसंध मानणारे विरुध्द देशाचे उत्तर-दक्षिण असा भेद करणाऱ्यांमध्ये!

## ▪ माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांचे प्रतिपादन

**राजदंड न्यूज नेटवर्क**



**पुणे :** लोकसभेची निवडणूकाचा संग्राम हा देश एकसंघ मानणारे विरुध्द देशाचे उत्तर दक्षिण असा भेद निर्माण करणार्यांमध्ये आहे. राष्ट्र प्रथम विरुध्द परिवार प्रथम मानणार्यांमध्ये हा संघर्ष असल्याचे भाजपचे माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी महायुतीचे समन्वयक संदीप खर्डेकर प्रदेश प्रवक्ते संजय मयेकर, सहप्रसिध्दी हेमंत लेले,पुष्कर तुळजापुकर यावेळी उपस्थित होते.

जावडेकर म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहा वर्षामध्ये केलेल्या कामामुळे देशाची आर्थिक प्रगती झाली आहे. जगामध्ये देशाची प्रतिष्ठा वाढली आहे. देशातील प्रत्येक नागरिकांपर्यंत मोदी सरकारच्या योजना पोहचल्या आहेत. त्यामुळे मोदींवर लोकांचा विश्वास अधिक वाढला असल्यामुळे यावेळी भाजपच्या नेतृत्वातील एनडीएला मोठे बहुमत मिळणार आहे. देशामध्ये रेल्वे, बंदरे, जलमार्ग आणि विमानतळे अशा पायाभुत सुविधांमध्ये मोदी सरकारने मोठे काम केले आहे. देशात प्रत्येक कुटूंबापर्यंत विकास पोहचला असल्याचे जावडेकर यांनी सांगितले.

देशामध्ये ७७ लाख लोकांकडे आज इंटरनेटची सुविधा आहे. जगात सर्वात स्वस्त डेटा हा भारतात मिळतो.नागरिकांच्या थेट खात्यामध्ये विविध योजनांचे पैसे जमा केले जातात. ३४ लाख कोटी रुपये मोदी सरकारने गरीबांच्या खात्यात जमा केले त्यामुळे मोदींना मत जनता देणार आहे. ३५ कोटी युवक आणि महिलांना मुद्रा कर्ज योजनेमुळे २० कोटीहून अधिक रोजगार निर्माण झाले. यामध्ये देशाची अर्थव्यवस्था अधिक बळकट झाली असल्याचे जावडेकर म्हणाले.

विरोधी पक्ष सध्या एनडीएला २७२ पर्यंत रोखण्याची भाषा करत आहे. त्यांच्यामध्ये निराशा असून पराभव समोर दिसत असल्यामुळे अशा प्रकारची विधाने केली जातात. विरोधक खोटा प्रचार करत आहेत. विरोधकांच्या प्रचाराला हितसंबधी गट देशातून आणि विदेशातूनही मदत करीत आहेत. एका टूलकिटनुसार त्यांचा प्रचार सुरु आहे, परंतू त्याचा पराभव झाल्याशिवाय राहणार नाही, असे जावडेकर म्हणाले.

# पुण्यात ४ मे रोजी 'संविधान अभ्यास वर्ग'

**पुणे :** महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, युवक क्रांती दल आणि भारत जोडो अभियानच्या वतीने शनिवार, दि. ४ मे २०२४ रोजी पुण्यात संविधान अभ्यास वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभ्यास वर्गामध्ये 'निवडणूक आयोग,आचारसंहिता आणि लोकसभा निवडणूक' या विषयावर राज्यशास्त्राचे आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाचे अभ्यासक प्रा.अविनाश कोल्हे मार्गदर्शन करणार आहेत.

हा अभ्यासवर्ग शनिवार, ४ मे २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजता एस.एम.जोशी फाउंडेशन सभागृह,पुणे येथे होईल. 'हा अभ्यास वर्ग सर्वांसाठी खुला असून प्रवेश विनामूल्य आहे. जास्तीत जास्त नागरीकांनी सहभागी व्हावे', असे आवाहन युवक क्रांती दलाचे राज्य उपाध्यक्ष संदीप बर्वे आणि पुणे शहर उपाध्यक्ष नीलम पंडित यांनी केले आहे.महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलाच्या वतीने आयोजित हा नववा संविधान अभ्यास वर्ग आहे.

# भाजपच्या कारकिर्दीत पुण्याच्या विकासाला 'ब्रेक' : रवींद्र धंगेकर

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** पुण्यात गेल्या १० वर्षात पुण्याच्या विकासाला खीळ बसली आहे. १०० नगरसेवक शहरातील सहाही आमदार आणि १ खासदार याबरोबरच केंद्रात व राज्यात सत्ता एवढे असूनही पुण्याच्या विकासासाठी मोठा विकास निधी केंद्र व राज्य सरकारकडून भाजपने का नाही मिळवला, असा प्रश्न महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार आ. रवींद्र धंगेकर यांनी उपस्थित केला. कसबा मतदार संघातील पदयात्रेच्या सांगता वेळी ते बोलत होते. पदयात्रेस कार्यकर्ते व नागरिक यांनी मोठी गर्दी केली होती.

धंगेकर म्हणाले की, काँग्रेस पक्षाने सन १९९२ ते २०१७ या कालावधीत मित्र पक्षांच्या मदतीने पुण्याच्या विकासाचा सुवर्णकाळ निर्माण केला. (पुणे पॅटर्नचा कालावधी सोडून). जवाहरलाल नेहरू योजनेतून पुण्याच्या विकासासाठी केंद्राकडून २५०० कोटी रुपयांचा विकासनिधी पुण्यासाठी आणला. त्यामुळे पुण्याच्या विकासात चांगली भर पडली. त्यानंतर मात्र भाजप सत्तेवर आल्यावर गेल्या ७ वर्षात पुण्याला कोणी वाली नाही असे चित्र उभे राहिले. याचे कारण म्हणजे पुण्याच्या विकासाबाबत भाजप निष्क्रिय राहिला. त्यामुळेच वाहतूक कोंडी, अपुरा पाणी पुरवठा, पर्यावरणाचे प्रश्न, बेकारी अशा अनेक प्रश्नांमुळे पुणेकर त्रस्त झाले. त्यासाठीच आता पर्वर्तन आवश्यक असून १३ मे या दिवशी महाविकास आघाडी व इंडिया आघाडी काँग्रेस पक्षाच्या चिन्हापुढील बटन दाबून काँग्रेसला विजयी करा, असे धंगेकर यावेळी पुढे म्हणाले.




# आंब्याच्या झाडावर चढलेला इसम बेशुध्द; अग्निशमन दलाकडून सुटका




**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** आज दिनांक ३०''०४''२०२४ रोजी दुपारी ०३''४८ वाजता अग्निशमन दल नियंत्रण कक्षात कोथरुड, पौड रोड, कृष्णा हॉस्पिटल जवळ, गल्ली क्रमांक ०३ येथे एका इमारतीच्या मागच्या बाजूस झाडावर एक इसम चढला असून तो अडकला आहे, अशी वर्दि मिळताच दलाकडून कोथरुड अग्निशमन केंद्र येथील फायरगाडी व मुख्यालयातून रेस्क्यु व्हॅन रवाना करण्यात आली होती.

सदर घटनास्थळी जवान पोहोचल्यावर त्यांनी पाहिले की, एका उंच आंब्याच्या झाडावर तीन फांद्याच्या मधोमध एक इसम सुमारे पस्तीस फुट उंच अडकलेल्या स्थितीत असल्याचे निदर्शनास आले. घटनेचे गांभीर्य ओळखून लगेच जवान दलाकडील शिडी झाडाला लावून झाडावर गेले आणि सदर इसमाशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला असता त्याची शुध्द हरपली असून तो बेशुद्ध अवस्थेत असल्याचे जाणवले. त्याचवेळी तातडीने रश्शी, दोर याचा वापर करुन रेस्क्यु बेल्टच्या साह्याने तसेच त्याचे वजन अंदाजे शंभर किलोच्या आसपास असल्याने विषेश गाठीचा उपयोग करुन त्या इसमाला हळूहळू व कोणतीही इजा होणार नाही याची काळजी घेत सुमारे ३० मिनिटात झाडावरुन खाली उतरवले आणि तातडीने अँब्युलंस मधून रुग्णालयात उपचाराकरिता रवाना केले.

सदर कामगिरीत अग्निशमन अधिकारी गजानन पाथ्रुडकर, तांडेल आंगद लिपाणे, वाहनचालक महेश शिळीमकर, शरद गोडसे, फायरमन रोशन हरड, वैभव आवरगंड, रविंद्र बडे, प्रतीक पागसे, मारुती देवकुळे, कृष्णा नरवटे, महेश घुले, सुबोध भुतकर, परेश जाधव यांनी सहभाग घेतला.

# वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी 'चांदणी चौक' प्रकल्प ठरेल पथदर्शी : मुरलीधर मोहोळ

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** शहराच्या बाजूने जाणाऱ्या महामार्गांमुळे शहराच्या प्रवेशद्वारांवर आणि अंतर्गत भागात होणारी वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी चांदणी चौकातील बहुमजली उड्डाणपूल प्रकल्प पथदर्शी ठरेल, त्यामुळे शहराच्या विकासचक्राला गती मिळेल असा विश्वास पुणे लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केला.




मोहोळ यांच्या प्रचारार्थ कोथरूड विधानसभेतील भेलकेनगर, गुजरात कॉलनी, आझादनगर, शास्त्री नगर, सुतारदरा, जय भवानीनगर, रामबाग कॉलनी, हनुमाननगर मार्गे मेगा सिटी परिसरात प्रचार फेरीचा समारोप झाला.

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, माजी खासदार संजय काकडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दीपक मानकर, मनसेचे नेते किशोर शिंदे, सुधीर धावडे, डॉ. संदीप बुटाला, माजी नगरसेविका छाया मारणे, वासंती जाधव, अल्पना वरपे, डॉ. श्रद्धा पाठक, दिलीप वेडे पाटील, किरण दगडे पाटील यांचा प्रमुख सहभाग होता.

मोहोळ म्हणाले, शहर आणि परिसरातील वाहतुकीची कोंडी कमी करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) कायमस्वरूपी तोडगा काढावा अशी आग्रही मागणी मी महापौर असताना केली होती. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण झाला.

मोहोळ पुढे म्हणाले, त्याच धर्तीवर गतिमान, सुरळीत आणि सुरक्षित वाहतुकीसाठी शहराच्या विविध भागात २१ ठिकाणी उड्डाणपूल, रेल्वे उड्डाणपूल किंवा ग्रेड सेपरेटर उभारण्यात येणार आहेत. शहराच्या वाहतूक कोंडीवर मार्ग काढण्यासाठी आणि अन्य प्रकल्पांसाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या दोन हजार कोटी रुपयांच्या तरतुदीतून ही कामे केली जाणार आहेत.

### नळस्टॉप चौकात पुण्यातील पहिला दुमजली उड्डाणपूल

''नळस्टॉप चौकात मेट्रो आणि महापालिकेचा संयुक्त प्रकल्पातून उभारलेल्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी दुमजली उड्डाणपुलामुळे कर्वे रस्ता परिसरातील वाहतूक सुसह्य झाली आहे. पुण्यातील हा पहिलाच दुमजली उड्डाणपूल असून, पुलावरून चार पदरी वाहतूक सुरू झाली आहे. त्यामुळे वाहतुकीचा आणि प्रवासाचा वेळ वाचण्यास मदत झाली आहे.''

# पंतप्रधान मोदींसाठीच्या 'दिग्विजय पगडी' पगडीने वेधले लक्ष!

## 'पगडी निर्मिती ठरली रोमांचक क्षण' - गिरीश मुरुडकर

**पुणे :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुण्यातील रेसकोर्स येथे सभेला संबोधित करताना परिधान केलेली खास 'दिग्विजय पगडी' लक्षवेधी ठरली.'पाहताक्षणी डोळ्यात भरणारी ही पगडी पारंपारिक पुरातन पद्धतीने तयार केली होती आणि ही निर्मिती प्रक्रिया आमच्यासाठी रोमांचक क्षण ठरली'अशा भावना मुरडकर झेंडेवाले यांच्यातर्फे गिरीश मुरुडकर यांनी पत्रकाद्वारे व्यक्त केली.





महायुतीचे पुणे लोकसभेचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी या पगडी निर्मितीची जबाबदारी मुरुडकर झेंडेवाले यांना दिली होती.त्यानुसार गिरीश मुरुडकर,अनुराधा मुरूडकर आणि यश मुरुडकर यांनी ही अनोखी निर्मिती साकारली होती.पंतप्रधान मोदी यांचे पुण्यात आजवर विविध पगडी घालून स्वागत करण्यात आले असून यंदाची पगडीही चर्चेचा विषय ठरली .

याबाबत माहिती देताना गिरीश मुरुडकर म्हणाले, 'ऐतिहासिक मराठा शौर्याची साक्ष देणाऱ्या, मोत्यांचा तुरा असलेल्या, शुभचिन्हे लावलेल्या आणि पंचधातूंनी सजवलेल्या या विशेष पगडीच्या शीर्षस्थानी तुळजाभवानीची प्रतिमा होती. दिग्विजयाला साजेशा सात घोड्यांच्या मंचाची संकल्पना यातून प्रतीत होत होती. त्यामुळे तिला दिग्विजय योद्धा पगडी नाव दिले गेले आणि ती लक्षवेधी ठरली.उन्हाळा लक्षात घेऊन सुसह्य ठरणारी बांधणी करण्यात आली होती.अशा कलात्मक आणि जबाबदारीच्या निर्मितीसाठी किमान १५ दिवस विविध संकल्पना,साहित्य यावर काम सुरु असते.'

मुरलीधर मोहोळ म्हणाले, 'पंतप्रधान मोदी यांचे आजवर अनेक पुणे दौरे झाले, त्यात त्यांचे विविध पगड्या घालून स्वागत केले गेले. पण दिग्विजय पगडी निश्चितच विशेष ठरली. दिग्विजयाची साक्ष देणारी ही पगडी मराठी परंपरेचा बाज आणि शौर्य दर्शविणारी होती.'

# असलम इसाक बागवान यांचा १ मे पासून सायकलवरून प्रचार

**पुणे :** ओबीसी बहुजन पार्टीचे पुरस्कृत उमेदवार तथा लोकसेना पार्टीचे अधिकृत उमेदवार असलम इसाक बागवान ( शिरूर लोकसभा मतदारसंघ) यांच्या प्रचाराची सुरूवात दि. १ मे रोजी महाराष्ट्र दिन तथा कामगार दिनाच्या दिवशी होत आहे. बागवान यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.



येत्या दहा दिवसात असलम इसाक बागवान हे हडपसर,आळंदी,भोसरी, राजगुरूनगर,मंचर, आंबेगाव, जुन्नर, शिरूर, न्हावरे, शिक्रापूर, वाघोली केशनंद, मांजरी, ससाणे नगर, सय्यद नगर, महंमदवाडी, उंड्री, पिसोळी एनआयबीएम , कौसरबाग, शिवनेरी नगर, भाग्योदय नगर, मिठानगर इत्यादी ठिकाणी सायकलवरून प्रचार करणार आहेत.

प्रचारादरम्यान ते लोकशाही मूल्य, प्रस्थापिताचे राजकारण, घराणेशाही, सरंजामशाही, भांडवलशाही यावर वाचा फोडणार आहेत. त्यांची निशाणी शिट्टी आहे. सर्व अल्पसंख्याक, दलित, ओबिसी, वंचित यांनी या प्रचारामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन असलम इसाक बागवान यांनी केले आहे.

# एकतर्फी वाटणारी निवडणूक बनली अतितटीची; उमेदवारांकडून प्रचाराचा धडाका

**तासगाव/मिलिंद पोळ**

सांगली लोकसभा निवडणुकीसाठीचा प्रचार आता अंतिम टप्प्याकडे चालला आहे. सुरुवातीला एकतर्फी वाटणारी ही लोकसभा निवडणूक विशाल पाटील यांच्या बंडखोरीमुळे अतितटीची बनली असल्याचे चित्र लोकसभा मतदारसंघात पाहायला मिळत आहे. महायुती व महाविकास आघाडी कडून सुरू असलेल्या प्रचारा सोबतच अपक्ष उमेदवार विशाल पाटील यांनीही जिल्हाभर प्रचाराचा धडाका उठवला आहे. भाजपला सुरुवातीला एकतर्फी व सोपी वाटणारी निवडणूक आता मात्र अतितटीची होत असल्याची जाणीव झाली आहे. प्रत्येक उमेदवार आपापल्या परीने प्रचार करत आहे. मात्र सुज्ञ मतदारांनी सावध पवित्रा घेत आपली भूमिका गुलदस्त्यात ठेवली आहे. त्यामुळे मतदारांच्या मनात काय चाललं आहे याचं मोठं कुतूहल इच्छुक उमेदवारांना वाटत आहे.

लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागल्यापासूनच सांगली जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापू लागले होते. सुरुवातीच्या काळात उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुकांनी मोठ्या मोठ्या फील्डिंग लावल्या होत्या. सांगली लोकसभेसाठी भाजपकडून विद्यमान खासदार संजय काका पाटील यांना तिसऱ्यांदा पक्षाकडून संधी मिळाली. महाविकास आघाडी कडून डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांना शिवसेना ठाकरे गटाकडून उमेदवारी घोषित झाली. दरम्यान काँग्रेसकडून जोरदार तयारी केलेले विशाल पाटील यांना महाविकास आघाडीकडून उमेदवारी डावलण्यात आली. काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी डावण्यात आल्यानंतर विशाल पाटील यांनी बंड करत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सांगली लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात एकूण २० उमेदवार आल्यामुळे ही निवडणूक बहुरंगी झाल्याचे चित्र कागदावर तरी दिसत आहे.

२०१९ च्या सांगली लोकसभा निवडणुकीप्रमाणे यंदाही प्रमुख तीन उमेदवारातच निवडणूक होईल असं जाणकारांचे मत आहे. भाजपकडून संजय पाटील, अपक्ष उमेदवार विशाल पाटील व शिवसेना ठाकरे गटाचे चंद्रहार पाटील हे प्रमुख चेहरे निवडणुकीत समोरासमोर दिसत आहेत. तसेच अन्य १७ उमेदवाराही निवडणूक रिंगणात आहेत.

भाजपकडून संजय पाटील यांना तिसऱ्यांदा संधी दिल्यामुळे त्यांनी सुरुवातीपासूनच प्रचारात जोरदार आघाडी घेतली आहे. सुरुवातीला महाविकासागाडीकडून चंद्राहार पाटील हेच उमेदवार रिंगणात राहतील असे शिवसेना नेते संजय राऊत यांच्याकडून स्पष्ट झाले होते. अपक्ष उमेदवार विशाल पाटील यांच्या माघारीसाठी वरिष्ठ पातळीवर भरपूर हालचाली झाल्या. त्यामुळे भाजपकडून संजय पाटील व महाविकास आघाडी कडून चंद्रहार पाटील यांच्यात प्रमुख लढत होईल असा अंदाज दिसत होता. त्यामुळे भाजपला ही निवडणूक आपण एकतर्फी सहज जिंकू शकतो असे वाटत होते. परंतु काँग्रेस नेते विशाल पाटील यांच्या बंडखोरीमुळे सांगली लोकसभा निवडणुकीचा नूरच बदलून गेला आहे.





## संजयकाकांची नियोजनबद्ध प्रचार यंत्रणा

**विद्यमान खासदार संजय पाटील हे तिसऱ्यांदा लोकसभा निवडणूक लढवत आहेत. संपूर्ण जिल्ह्यात त्यांची प्रचार यंत्रणा अतिशय नियोजनबद्ध सुरू आहे. तासगाव तालुक्यातील असंख्य कार्यकर्ते सकाळी शिदोरी सोबत घेऊनच गावोगावात प्रचार करत आहेत. तर संजय काकांच्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती जिल्हाभर प्रचारासाठी पायाला भिंगरी बांधून फिरत आहे.**

विशाल पाटील यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरावा यासाठी कार्यकर्त्यांकडून दबाव टाकण्यात आला. तसेच माजी मंत्री अजितराव घोरपडे व भाजपचे माजी आमदार विलासराव जगताप यांनी उघड उघड विशाल पाटील यांना पाठिंबा दर्शवत उमेदवारी दाखल करण्यास भाग पाडले. विशाल पाटलांच्या उमेदवारी मागे कार्यकर्त्यांचा आग्रह व दृश्य अदृश्य नेत्यांचा पाठिंबा असल्याचे समर्थकांकडून सांगण्यात येत आहे. लोकसभा निवडणुकीच्या उमेदवारीच्या घोषणेपासूनच महाविकास आघाडीत बिघाडी असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत होते. शिवसेना नेते संजय राऊत यांच्या दौऱ्यानंतर सांगलीतील राजकारण फार गतीने फिरल्याचे जाणकार सांगतात. संजय राऊत आणि विशाल पाटील व विश्वजीत कदम यांच्यावर केलेल्या ठीके नंतर कार्यकर्त्यांच्या असंतोष निर्माण झाला त्याचाच परिणाम विशाल पाटील यांची बंडखोर उमेदवारी असल्याचे बोलले जात आहे.

सांगली जिल्ह्यात शिवसेना ठाकरे गटाची ताकद नसताना त्यांनी उमेदवारीसाठी केलेला अट्टाहास याच कारणामुळे महाविकास आघाडीत बंडखोरी होऊन विशाल पाटील मैदानात आले. त्यामुळे सहाजिकच शिवसेना उमेदवार चंद्रहार पाटील यांच्यासमोर मोठी अडचण निर्माण झाली आहे. विशाल पाटील यांच्या उमेदवारीला काँग्रेस व राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांकडून खुला पाठिंबा दिसून येत नसला तरी त्यांचे कार्यकर्ते मात्र विशाल पाटलांच्या प्रचारात आघाडीवर असल्याचे चित्र जिल्ह्यात दिसत आहे. याबाबत शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार चंद्रहार पाटील यांनी महाविकास आघाडीच्या मेळाव्यात जाहीर नाराजी व्यक्त केली आहे.

दरम्यान, भाजपकडून मात्र ही निवडणूक अत्यंत गांभीर्याने घेण्यात आली आहे. सुरुवातीपासूनच संजय काका पाटील प्रचारात आघाडीवर असल्याचे दिसत आहे. भाजपमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आणून न देता सर्वच नेते मंडळींनी एकत्रित उमेदवाराचा प्रचार करण्याचे आदेश हाय कमांडकडून आल्याची माहिती मिळत आहे. त्याच पार्श्वभूमीवर भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष व माजी आमदार पृथ्वीराज देशमुख यांच्या मतदारसंघात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा घेण्यात आली होती. फडणवीस आणि पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार करण्याचे आदेश दिले आहेत. जी काही नाराज असेल ते आपण आपसात बसून मिटवू पण निवडणूक काळात एकमेकांची उणीध्वनी काढू नका अशी तंबीच फडणवीसांनी दिल्याची सूत्रांकडून माहिती मिळत आहे.

खासदार संजय पाटील यांच्या प्रचारार्थ १ मे रोजी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची सांगली मध्ये सभा होणार आहे. तर देशाची गृहमंत्री अमित शहा यांची ही सभा खानापूर आटपाडी मतदारसंघात होत आहे. अपक्ष उमेदवार विशाल पाटील यांनीही प्रचाराचा धडाका उठवला असून थेट गाठीभेटीवर त्यांनी भर दिला आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रहार पाटील यांच्या प्रचारार्थ घटक पक्षातील आमदार व कार्यकर्ते पदयात्रा व भेटीगाठी घेत आहेत. सुरुवातीला एकतर्फी वाटणारी निवडणूक अतितटीची बनल्यामुळे नेत्यांनी आपली प्रचार यंत्रणा टाईट करायला सुरुवात केली आहे. काही उमेदवार तर पहाटे पासून रात्री उशिरापर्यंत प्रचारात व्यस्त असल्याचे दिसत आहे. एकूणच काय तर सांगली लोकसभेची निवडणूक यावी ऐतिहासिक होणार असंच दिसत आहे.

## नेत्यांच्या प्रचारात 'मशाल', कार्यकर्त्यांच्या मनात 'विशाल'?

**सांगलीत महाविकास आघाडीत सुरू असणाऱ्या प्रचारात वेगळे चित्र दिसत आहे. महाविकास आघाडीचे नेते चंद्रहार पाटील यांच्या प्रचारात दिसत असून स्थानिक कार्यकर्ते मात्र या प्रचारापासून लांब असल्याचे जाणवत आहे. पलूस -कडेगाव व तासगाव -कवठेमहांकाळ मतदार संघात नेत्यांच्या प्रचारात मशाल तर कार्यकर्त्यांच्या मनात विशाल? असंच काहीसं चित्र स्पष्टपणे दिसत आहे. याबाबत महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रहार पाटील यांनी वरिष्ठांकडे खंत व्यक्त केली आहे.**

# 'सैनिकी पॅटर्न' निवासी शाळेतील ३५ विद्यार्थ्यांना जेवणातून विषबाधा



**येथील सैनिकी पॅटर्न निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याने विद्यार्थ्यांवर येथील खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले.**

**कुरुंदवाड/प्रतिनिधी**

येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सैनिकी पॅटर्न निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना रविवारच्या दुपारच्या जेवनातून सुमारे ३५ विद्यार्थ्यांना विषबाधा झाली आहे. जेवणानंतर काही विद्यार्थ्यांना उलटी व जुलाब होवू लागल्याने शाळा व्यवस्थापनाने बाधित विद्यार्थ्यांना शहरातील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून पालकांतून चिंता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, रविवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास जिल्हा वैद्यकीय अधिकारी विद्यार्थ्यांच्या आरोग्याची पाहणी करण्यासाठी येणार आसल्याने उपचार करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

येथील माळभागावर सैनिकी पॅटर्न निवासी शाळा आहे. पाचवी ते दहावी पर्यंत शिक्षण दिले जाते. शाळेत राज्यातील विविध जिल्ह्यांतून विद्यार्थी शिक्षणासाठी निवासी आहेत.

रविवारी दुपारी जेवणानंतर काही विद्यार्थ्यांना उलटी व जुलाब होवू लागले. अन्नातून विषबाधा झाल्याचे लक्षात येताच शाळा व्यवस्थापनाने विषबाधा झालेल्या विद्यार्थ्यांना स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले. सायंकाळपर्यंत २० मुलांवर उपचार करुन सोडून देण्यात आले. मात्र जास्त बाधित झालेल्या १५ मुलांना रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून विषबाधा झाल्याचे समजताच पालकांतून चिंता व्यक्त होत आहे. कोल्हापूर सांगली सोलापूर पंढरपूर पुणे आधी भागातून विद्यार्थी येथील सैनिक पॅटर्न शाळेत प्रवेश घेतला आहे.

**मुलांना रोज ताजे अन्न दिले जाते. रविवारी उष्णतेचा पारा खूप होता. दुपारी जेवणानंतर उन्हात खेळतांना अतिउष्णतेमुळे मुलांना उलटी व जुलाब होवू लागले. त्यांना त्वरित रुग्णालयात दाखल केले असून चिंता करण्यासारखे काही नाही. अन्नातून विषबाधा नसून तीव्र उष्णतेचा परिणाम मुलांच्या आरोग्यावर झाला आहे.**

**– प्रा. शरद पराडकर**
**अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, कुरुंदवाड**

# लोकसभा निवडणुकीत मला पाडण्यासाठी साखर कारखानदाराचा १०० कोटींचा डाव : शेट्टी

**कोल्हापूर :** धैर्यशील माने व सत्यजीत पाटलांसाठी लोकसभा निवडणुकीत साखर कारखानदार १०० कोटींचा डाव खेळत आहेत. शेतकरी चळवळ संपविण्यासाठी या दोघांच्या खांद्यावर बंदूक ठेवून साखर कारखानदारांनी कटकारस्थान रचले आहे, असा गंभीर आरोप स्वाभिमानी पक्षाचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी केला.

बिळाशी( ता. शिराळा )येथील जाहीर सभेत बोलत होते. शेतकरी चळवळ ही कष्टकऱ्यांच्यासाठी उभी केली आहे. कितीही वार झाले तरी मी झेलायला समर्थ आहे, असेही शेट्टी म्हणाले.

हातकणंगले लोकसभा मतदारसंघांमध्ये यावेळी पंचरंगी सामना होत आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने राजू शेट्टी हे तिसऱ्यांदा निवडणूक लढवत आहे.तर त्यांच्या विरोधात महायुतीचे विद्यमान खासदार धैर्यशील माने , महाविकास आघाडीचे ठाकरे सेनेचे माजी



आमदार सत्यजित पाटील सरूडकर, बहुजन वंचित आघाडीचे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डी. सी. पाटील ,शेतकरी संघटनेचे नेते रघुनाथ दादा पाटील आदी प्रमुख उमेदवार आहेत. या मतदारसंघांमध्ये साखर कारखानदारांची संख्या अधिक असल्याने आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांची नेतेही अधिक असल्याने निवडणुकीला साखर कारखानदार विरुद्ध ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे नेते असे वळण लागले आहे. या पार्श्वभूमीवर राजू शेट्टी यांनी केलेला हा आरोप चर्चेला कारण ठरला आहे.

यावेळी बोलताना शेट्टी म्हणाले, निवडणुकीत रंगत वाढत नाही म्हटल्यावर या दोन्ही आघाडीकडून मोठ्या प्रमाणात पैशाचा वापर सुरू झाला आहे. जेवणावळी सुरू केल्या आहेत. पैशाच्या राशी बाहेर निघत आहेत. प्रत्येक साखर कारखानदारांना यांनी टार्गेट दिले आहे. त्याप्रमाणे ते प्रामाणिक पणे यांच्यासाठी पैसा खर्च करत आहेत. शेतकऱ्यांची बिले देण्यास पैसे नाहीत म्हणून ओरड करणाऱ्या कारखानदारांना निवडणुकीत पैसा कुठून आला? आमच्या हक्काचे पैसे द्यावेत म्हणून मी पदयात्रा काढली. आंदोलने केली, महामार्ग रोखला मग सरकार जागे झाले. आमचे १०० रूपये का दिले नाहीत? त्याचे श्रेय मला मिळू नये म्हणून या साखर कारखानदारांनी मुख्यमंत्र्यावर दबाव टाकला.

मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या सोयीप्रमाणे निर्णय घेतला. आचारसंहिता संपल्यावर मी यांना सोडणार नाही. शेतकऱ्यांचे पैसे दिल्याशिवाय रस्त्यावर देखील फिरू देणार नाही. काटामारी करणाऱ्या साखर कारखान्याविरोधात विशेष मोहिम उघडलेली आहे. साखर कारखान्यांचे सर्व काटे डिजीटल करून संगणकीय प्रणाली जोडून त्यामध्ये सुसुत्रता आणावी, यासाठी मी वेळोवेळी मंत्रालयाच्या पायऱ्या झिजवल्या आहेत. तरीही सरकारने अजून मान्यता का दिली नाही? दरवर्षी शेतकऱ्यांच्या उसातून ४५०० कोटींचा काटा हे साखर कारखाने मारतात. शेतकऱ्यांना अजून किती लुटणार आहात ? काटा मारणाऱ्या साखर कारखानदारांचा या निवडणुकीत शेतकरी काटा काढतील, असे इशारा यावेळी राजू शेट्टी यांनी दिला. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशअध्यक्ष संदीप जगताप, रवी मोरे, वसंत पाटील, राम पाटील, मानसिंग पाटील, सुरेश म्हाऊटकर आदी उपस्थित होते.

# 'आनंद तरंग' कार्यक्रमाचे ४ मे रोजी पुण्यात आयोजन

**पुणे :** भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत ' आनंद तरंग ' या गाण्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन दि.४ मे २०२४ रोजी करण्यात आले आहे.

'स्वरगंध, पुणे' प्रस्तुत या कार्यक्रमात डॉ.नीलिमा राडकर या व्हायोलिनमधून आणि माधवी करंदीकर या हार्मो नियममधून शास्त्रीय संगीतावर आधारित सुप्रसिद्ध चित्रपटगीते , भावगीते सहवादनातून सादर करतील.रवींद्र क्षीरसागर, जितेंद्र पावगी(तबला),नरेंद्र काळे (तालवाद्य) हे साथसंगत करणार आहेत. यशश्री पुणेकर या कार्यक्रमाचे निवेदन करणार आहेत.

हा कार्यक्रम शनिवार, दि. ४ मे २०२४ रोजी सायंकाळी साडेपाच वाजता भारतीय विद्या भवनचे सरदार महादेव बळवंत नातू सभागृह, (सेनापती बापट रस्ता) येथे होणार आहे. हा २०५ वा कार्यक्रम आहे.भारतीय विद्या भवनचे मानद सचिव प्रा.नंदकुमार काकिर्डे यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.

# ओबीसींचं मत ओबीसीलाचं...!

## फलटण तालुका ओबीसी संघर्ष समितीचा एकमुखी ठराव

**फलटण/प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने रविवारी सायंकाळी फलटण तालुका ओबीसी संघर्ष समितीची सावतामाळी मंदिर, फलटण येथे महत्वपूर्ण व निर्णायक बैठक पार पडली. यामध्ये सर्वानुमते ओबीसीचं मत ओबीसी उमेदवारालाच द्यायचं, असा एकमुखी निर्णय घेण्यात आला. यावेळी फलटण तालुक्यातील बहुसंख्य ओबीसी नागरिक उपस्थित होते. लोकशाही पद्धतीने हात उंचावून व आवाजी मतदानाने हा ठराव संमत करण्यात आला.

माढा लोकसभा मतदारसंघाच्या राजकीय समीकरणात प्रत्येक दिवशी नवनवीन घडामोडी घडत असताना आज फलटण तालुका ओबीसी संघर्ष समितीने ओबीसीचं मत ओबीसी उमेदवारलाच द्यायचा महत्वपूर्ण निर्णय घेतल्याने राष्ट्रवादी शरद पवार गट व भाजपच्या गोटात चिंता निर्माण झाली आहे. दोन्ही पक्षांचा लोकसभेचा प्रचार अंतिम टप्प्यात आलेला असताना ओबीसी संघर्ष समितीने घेतलेला निर्णय दोन्ही प्रस्थापित उमेदवारांना त्रासदायक ठरणारा आहे.

फलटण तालुका ओबीसी संघर्ष समिती पहिल्यापासूनच ओबीसींच्या हक्कांसाठी लढताना दिसत आहे. मराठा आंदोलनाविरुद्ध व खोट्या कुणबी दाखल्याविरुद्ध फलटण तालुका ओबीसी संघटनेने १ लाख २७ हजार हरकती गोळा केल्या होत्या. एवढ्या मतांची बेरीज एकट्या फलटण तालुक्यात असल्याने संघर्ष समितीचा हा निर्णय ओबीसींची एकजूट व ताकत दाखवणारा आहे, ज्यामुळे दोन्ही उमेदवारांची धाकधूक वाढणार, एवढं मात्र नक्की.

# 'अनुवेध' मधून कथक नृत्याचे विलोभनीय दर्शन!

## आंतरराष्ट्रीय नृत्य दिनानिमित्त आयोजन; नृत्यातून प्रकटावेत नवोन्मेष - मनिषा साठे





**पुणे :** आंतरराष्ट्रीय नृत्यदिनानिमित्त 'मनीषा नृत्यालय'च्या वतीने आयोजित 'अनुवेध ' या कथक नृत्य सादरीकरणाला सोमवारी सायंकाळी चांगला प्रतिसाद मिळाला ज्येष्ठ नृत्यगुरू मनीषा साठे यांच्या शिष्यांनी आपापल्या विद्यार्थीनींसमवेत विलोभनीय नृत्य सादर केले तसेच मनीषा साठे यांनीही नृत्यरचना सादर करून आंतरराष्ट्रीय नृत्यदिनाचा आनंद द्विगुणित केला ! एकूण १३५ नृत्यांगनांनी या सादरीकरणात सहभाग घेतला.

हा कार्यक्रम दि.२९ एप्रिल रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह (कोथरूड) येथे सायंकाळी ६ वाजता झाला.ज्येष्ठ लेखक आणि कला समीक्षक आशीष मोहन खोकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शांभवी दांडेकर,शिल्पा दातार,मंजिरी कारुळकर,पद्मश्री जोशी,पूर्वा शाह,मानसी गदो ,तेजस्विनी साठे, माधुरी आपटे,गौरी स्वकुळ,ईशा काथवटे,अदिती कुलकर्णी,पायल गोखले,वल्लरी आपटे,मिथिला भिडे,मधुरा आफळे यांनी आणि त्यांच्या विद्यार्थिनींनी कार्यक्रमात नृत्य सादर केले.ज्येष्ठ नृत्यगुरू मनीषा साठे यांनी एक श्लोकी रामायणावर आधारित एक नृत्यरचना सादर केली . त्यांच्या शिष्यांनी झपताल,रास नृत्य,चतरंग,देवी अभंग,पदन्यास,बंदिश,संयुज,गज झंपा ताल,चांद्रयान पोवाडा,अभिसारिका बंदिश,कथक जेंबे,श्याम छबी,तराणा आदी सादरीकरणे प्रभावीपणे सादर केली आणि उपस्थितांची वाहवा मिळवली.संपूर्ण नाट्यगृह नृत्यरसिकांनी भरले होते.

सूत्रसंचालन वल्लरी आपटे यांनी केले. तर नृत्य कार्यक्रमाचे निवेदन अदिती कुलकर्णी यांनी केले.यावेळी मनिषा साठे यांच्या सर्व शिष्यांनी त्यांचा सत्कारही केला .अजय पराडे, शमा भाटे, अतुल उपाध्ये, अजय धोंगडे, केदार पंडित, रवींद्र दुर्वे ,नितीन सातव आदी मान्यवर उपस्थित होते.



आंतरराष्ट्रीय नृत्य दिनानिमित्त आयोजित 'अनुवेध' या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ज्येष्ठ नृत्य गुरु पं.मनीषा साठे म्हणाल्या,' शिष्यांनी नृत्य सादर करताना वा नृत्य रचना करताना, पूर्वी स्वतः वा दुसऱ्याने केलेल्या रचना वा विचारांची पुनरावृत्ती करू नये, तर प्रत्येक वेळी नवनवीन विचार , कथा, संकल्पना व नृत्य रचना नाविन्यपूर्ण सादर करावी अशी माझी अपेक्षा असते, आणि या कसोटीमध्ये या वर्षीही माझ्या शिष्या यशस्वी झाल्या.नृत्यातून नवोन्मेष प्रकटावेत आणि त्यासाठी परिश्रम घ्यावेत. देशाला आणि पुण्याला नृत्याची उज्वल परंपरा आहे,ही परंपरा पुढे नेण्यासाठी योगदान द्यावे'.

ज्येष्ठ कला समीक्षक आशीष खोकर म्हणाले,'आज ज्या नृत्यांगनांनी नृत्य सादर केले ते अतिशय उत्तम तयारीचे होते.कथक नृत्याचा दिल्ली हा गड नसून खऱ्या अर्थाने पुणे हाच नृत्याचा गड आणि धरोहर आहे.पुणे हे संपूर्ण भारत देशालाच नव्हे तर जगाला भरतनाट्यम आणि कथक नृत्याच्या दृष्टीने सतत प्रेरणा देणारे शहर आहे, आणि यात अर्थातच नृत्य गुरूंचा वाटा, त्यांचं ज्ञान आणि परिश्रम महत्वाचे आहे.